# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## (स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रमाचा अहवाल व लेखे

# 2019-20

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## २०१९-२०

# नियमित कार्यक्रमाचा अहवाल

# व

# जमा खर्च

**कार्यक्रमाधिकारी**

डॉ.के.डी.सावंत

डॉ.पी.जी.त्रिमुखे

डॉ. एस.व्ही. पाटील

**प्राचार्य**

डॉ.एम.एच.गव्हाणे

D:\2020-21 (PC-2)\NSS\Ahwal(2)

## राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
## राष्ट्रीय सेवा योजना

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करत त्यांच्यात श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक कार्याची जाणीव निर्माण करुन त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग सतत कार्यशील असतो. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर १०० व वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर २५० विद्यार्थी स्वयंसेवकांची संख्या मंजूर करण्यात आली. या विभागाच्या वतीने वर्षभरात कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी स्वयंसेवकांकडून विविध उपक्रम राबविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये रासेयोची स्थानिक समन्वय समितीची बैठक दि. २७ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत विविध विषयांवर सखोल चर्चा करुन कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. सदर शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम/ कार्यक्रम राबविण्यात आले. ते सविस्तरपणे पुढे नमूद करण्यात आले आहेत.

**१) पुण्यतिथि निमित्त शिवाजी महाराजांना अभिवादन :**

दि. ०३ एप्रिल २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांना पुण्यातिथिनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. केडी. सावंत, रसायन शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. सानप, अर्थशास्त्र विभागाचे प्रा. सुधीर जाधव, रासेयो चे विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, निलेश लमले,महेश मुंडे, आकाश सोनकांबळे व इतर शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**२) रासेयोच्या स्वयंसेवकांसाठी निरोप समारंभ व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम :**

दि. ८ एप्रिल २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील अंतीम वर्षातील स्वयंसेवकांसाठी निरोप समारंभ घेण्यात आला. याच वेळी दि. २४ सप्टेंबर ते ९ आक्टोबर २०१८ दरम्यान राष्ट्रीय कुष्ठरोग शोध मोहिमेत ज्या विद्यार्थ्यांनी/स्वयंसेवकांनी सर्वेक्षणासाठी योगदान दिले त्या स्वयंसेवकांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे व वैद्यकिय विभागाचे डॉ. हाळकुडे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, रासेयोचे विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, चव्हाण विष्णू, मोरे प्रतिक्षा, कांबळे पांडूरंग,पिंड रोहित, हारडे अंजली, इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रांत शंके यांनी तर आभार कु. स्वाती पवार हिने केले.

**३) महात्मा ज्योतिबा फुले जयंती (११ एप्रिल २०१९)**

दि. ११ एप्रिल २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागात थोर क्रांतिकारक व समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांची जयंती साजरी करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू, डॉ. ई.यू. मासूमदार, उपप्राचार्य प्रा.विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुचेता वाघमारे तसेच महाविद्यालयातील अभ्यागत प्राध्यापकांची टीम व रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.व्ही.ए. गवळी प्रा.एस.डी. शिंदे, महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (दि.१४ एप्रिल २०१९) :**

रविवार दि. १४ एप्रिल २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात

आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्राचार्यडॉ. महादेव गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी आंबेडकर यांच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले. यावेळी रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ. पी.जी. कावळे, प्रा. एस.डी. शिंदे, प्रा.एन.एस. पिंपळे, डॉ.एस.जे. फुले, प्रा. नानासाहेब काळे, सेवक गोविंद जाधव, रासेयोचे विद्यार्थी प्रतिनिधी विक्रांत शंके, स्वामी पवार, विशाल जाधव व इतर प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी उपस्थित होते.

**५) लोकसभा निवडणूक महोत्सव २०१९ मध्ये व रासेयोच्या मतदानदूताचा सक्रीय सहभाग :**

दि. १८ एप्रिल २०१९ रोजी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने संपूर्ण भारतात लोकसभा मतदान निवडणूक महोत्सव राबविण्यात आले. या कार्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी दि. १७ एप्रिल रोजी मतदारच्या जाणीव जागृतीसाठी अभियान राबवले व दि. १८ एप्रिल २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील मतदान केंद्र क्रमांक १२९ व १३० मध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना +2 स्तर च्या एकूण १८ स्वयंसेवकांनी मतदानदूत स्वयंसेवक म्हणून भूमिका पार पाडली. यावेळी सदर मतदान केंद्रामध्ये मतदान करण्यासाठी येणाऱ्या शारीरिकदृष्ट्या असुदृढ असणाऱ्या तसेच अंध, अपंग व्यक्तिंना व्हीलचेअर वर बसवून पोलिंग बुधाच्या कक्ष पर्यंत पोहचविण्याचे कार्य केले. तसेच महाविद्यालयातील केंद्रावर मतदान शांततेत व यशस्वीरित्या पार पडेल याची काळजी घेतली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य विलास कांबळे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा.विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, दोन्ही बुथवरील सहा निवडुक निर्णय अधिकारी, सुरक्षा रक्षक व रासेयोचे विद्यार्थी स्वयंसेवक कु. पवार प्रीती, बोधनकर वैष्णवी, कुलकर्णी सुजाता, कांबळे वैशाली, मिरजकर रेणुका, पिंड रोहित, भंडारे शंकर, कांबळे पांडुरंग, शेख फरमान, मुळे शिहार, कांबळे अनुराधा, श्रीगीरे दिपाली, हारडे अंजली, बोयणे अनुसया, बनसोडे ऋतीका, मोरे करण, गवळी अनंतऋषी, पांढरे विनोद इत्यादींनी विशेष सहकार्य केले.

**६) पाणी फाऊंडेशन द्वारा आयोजित वाटर कपच्या महाश्रमदान शिबिरात सहभाग :**

बुधवार दि. ०१ मे, २०१९ रोजी वाघोली ता. औसा, जि. लातूर येथे पाणी फाऊंडेशनद्वारा आयोजित वाटर कपच्या महाश्रमदान शिबिरात राजर्षी शाहू महाविद्यालयातील मूल्यशिक्षण विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांनी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घेऊन जलसंधारणासाठी श्रमदान करून आपले योगदान दिले. यावेळी 'पाणी अडवा पाणी जिरवा' ही मोहिम राबविण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व दगड मातीचे बांध बांधणे, पाणी जिवण्यासाठी खड्डे खोदणे इ. कामासाठी श्रमदान केले. जि.प. लातूरचे शिक्षणाधिकारी श्री. विपीन ईटनकर, उपजिल्हाधिकारी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा. व्ही.ए. गवळी इतर प्राध्यापक डॉ.सी.ए. दवणे, डॉ. एस.डी. भंडारे, प्रा. मनिषा धोंड, डॉ. आर.बी. आडे, डॉ.ए.जी. लुंगे, प्रा.पी.जी. बट्टेवार, प्रा.जे.एम.शेख, प्रा.एस.डी. कदम, प्रा.अकाश वाघमारे, प्रा.व्ही.जे. दळवी, डॉ.व्ही.डी. धुमाळ, प्रा.एस.आर. जाधव, प्रा.सी.व्ही. कुलकर्णी, प्रा.डी.जी. पालके, प्रा.एम.एस. मदने, प्रा.एन.एस. सुदेवाड, प्रा.ए.के. शेख, प्रा.पी.जी. जोशी, प्रा.सी.पी. आहाळे, प्रा.एम.बी. भाताडे व रासेयो स्वयंसेवक विशाल जाधव, निलेश चलमले, आकाश सोनकांबळे, स्वाती पवार, विक्रांत शंके, सुमित सुर्यवंशी, प्रतिक्षा भुरे, सुजाता कुलकर्णी, शेदारला नाविया, ऋतुजा मुंडे, अंकुश सुर्यवंशी, अनंत गवळी, पांडूरंग कांबळे, प्रतिक्षा सोमवंशी, ऐश्वर्या बिरादार, वैष्णवी हाळे, पल्लवी करे, वैष्णवी बोधनकर इत्यादीनी विशेष परिश्रम घेतले.

**७) राजर्षी शाहू महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी :**

दि. ७ मे २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व 'बसव सेवा संघ' लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात जाती, पंथ, धर्म, भेद चातुर्याचा प्रखर विरोध करुन अनुभव मंटपाच्या माध्यमातून आंतर्जातीय विवाहास मान्यता देऊन समतेचा लढा दिला. ज्या महापुरुषाने कधी धर्म पाळला नाही व मानवता हेच एकमात्र धर्म समजले त्यांच्या

नावाने धर्माची मागणी करने म्हणजे त्यांच्याच विचारांना फारा देण्यासारखे आहे म्हणून अशा महापुरुषांना देवाचे रूप देण्यापेक्षा त्याचे विचार अंगीकारुन मानव धर्म जपला पाहिजे असे विचार या कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी कार्यक्रमात व्यक्त केले.

या प्रसंगी उपप्राचार्य ए. जे. राजु, उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार, ग्रंथपाल प्रा.एस. बी. मस्के, प्रा. डी. जी. पालके, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्राधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेवशिंदे, प्रा. श्रीनिवार मोरे, प्रा. माधव शेळके, प्रा. किरण शिंदे, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. गोविंद जाधव, श्री वसंत गुंड, श्री रामलिंग स्वामी, श्री पांडुरंग भोगिले, श्री महेश शिंदे, श्री धनु राठोड, श्री हरिश बंडगर, श्री जयप्रकाश गोणे, बसव सेवा संघचे श्री महेश बिडवे, रासेयोचे विद्यार्थी प्रतिनिधी विक्रांत शंके, निलेश चलमले, पवन कांबळे, परमेश्वर बिराजदार, शिवकांत , गुट्टे, अमित माने, राम माने, कुलदिप नेरले, प्रसाद काळे इत्यादी कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रांत शंके यांनी तर आभार प्रदर्शन रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी केले.

**८) जागतिक योग दिनानिमित्त महाविद्यालयात योग शिबीर :**

दि. २१ जून २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी. विभागाच्या वतीने पाचवा आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबीर सत्राचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी पतंजली योग समितीचे याग प्रशिक्षक प्रा. शाहुराजे औताडे यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना अत्यंत सहजपणे करता येऊ शकणाऱ्या योगासन व प्राणायामाचे प्रकार शिकवले.

या योग शिबीर सत्रात शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य डॉ. शेखर गरड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार, अप्राचार्य प्रा. विलास कांबळे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, डॉ.एस.जे. कुलकर्णी, डॉ. ओमप्रकाश शहापूरकर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर बंधु-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबीरात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयतील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोमदेव शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे व मान्यवरांचे आभार महाविद्यालयाचेप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी मानले.

**९) छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती :**

दि. २६ जून २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी यावेळी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, सचिव अनिरुध्द जाधव व संस्थेचे इतर सदस्य तसेच प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई. यू.मासूमदार, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, पर्यवेक्षिका प्रा. सुचेता वाघमारे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे व महाविद्यालयातील सर्व शिक्षक,, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१०) स्वामी विवेकानंद जयंती :**

दि. ५ जुलै २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वामी विवेकानंद यांची पुण्यतिथी साजरी करण्यत आली व त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई. यू.मासूमदार, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. आर. एन. शिंदे, प्रा. सोनाली पवार, प्रा. नितीन माने, प्रा. सूर्यकांत मस्के, श्री पांडुरंग भोगिले विद्यार्थी प्रतिनिधी विक्रांत शंके, स्वाती पवार इत्यादी उपस्थित होते.

**११) गुटखा, तंबाखु व धुम्रमानमुक्त अभियान:**

दि. ११ जुलै २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुटखा, तंबाखु व धुम्रपान मुक्त अभियान राबविण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला मी गुटखा खाणार नाही, मी धुम्रपान करणार नाही अशी शपथ देण्यात आली, व गुटखा, तंबाखु यापासून दूर रहावे असे आवाहन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा सोमदेव शिंदे व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१२) शेतकरी विठ्ठल वारकरी महोत्सवात सक्रीय सहभाग :**

दि. २१ जुलै २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कवठा येथील मा. विनायकराव पाटील यांच्याद्वारे लातूर मध्ये आयोजित शेतकरी विठ्ठल वारकरी महोत्सवात सक्रीय सहभाग घेतला. या महोत्सवाची सुरुवात राजीव गांधी चौक लातूर येथून झाली तर आंबेडकर पार्क जवळ संजय टाऊन हॉलच्या मैदानावर या महोत्सवाचे समारोप झाले. यावेळी रॅलीमध्ये रासेयोच्या स्वयंसेवकांनी शेतकऱ्यांची वेशभुषा धारन करुन टाळ, मृदंग वाजवत भारतीय संस्कृतिचे दर्शन घडविले. त्या कार्यक्रमात शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला होता.

**१३) लोमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद जयंती :**

दि. २३ जुलै २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लोकमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद यांची जयंती साजरी करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजु, उपप्राचार्य डॉ. ई. यु. मासूमदार, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व रासेयोचे विद्यार्थी स्वयंसेवक बुके शिवानंद, प्रसाद काळे, कु. हारडे अंजली व इतर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१४) अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी :**

दि. ०१ ऑगस्ट २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी दोघेही महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पार्पण केले गेले. डॉ. भीमराव पाटील व डॉ. संभाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. पुष्पलता त्रिमुखे व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयोचेकार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. कल्याण सावंत यांनी केले.

**१५) आपत्ती व्यवस्थापन व अग्नीशमन प्रशिक्षण :**

दि. ०९ ऑगस्ट २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन व अग्नीशमन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवकांना अचानक आग लागलेल्या ठिकाणी आपत्तीचे व्यवस्थापन व अग्नीचे समन कशा पध्दतीने केले पाहिजे याचे प्रात्यक्षिक सादर करुन प्रशिक्षण देण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, उपप्राचार्य डॉ.ई. यू. मासूमदार, डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, प्रा. अनिरुध्द बिराजदार, ग्रंथपाल प्रा. सूर्यकांत मस्के, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, श्री गोविंद जाधव, श्री रामदास कांबळे व आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि महाविद्यालयाती शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१६)   तिरंगा पदयात्रेत सहभाग :**

दि. १४ ऑगस्ट २०१९ रोजी अखील भारतीय विद्यार्थी परिषद लातूर व राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. यावेळी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांनी रॅलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर रॅली व पदयात्रा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, रासेयोचे कार्यक्रमाधिकरी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष व सर्व सदस्यांनी तिरंगा पदयात्रा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

**१७)   स्वातंत्र्य दिन :**

दि. १५ ऑगस्ट २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य श्रीमान प्रकाश देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, सचिव प्राचार्य अनिरुध्द जाधव यांच्यासह सर्व संस्थेचे सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. एजे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार, पर्यवेक्षिका प्रा. सुचेता वाघमारे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१८)   रासेयो स्वयंसेवकांना एच.आय.व्ही. टेस्टींग ट्रेनर ट्रेनिंग :**

दि. २१ ऑगस्ट रोजी जिल्हा आरोग्य विभाग यांच्या वतीने राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थी स्वयंसेवकांना एच्. आय. व्ही. रोग म्हणजे काय? त्याची लक्षणे कोणती याबाबत मार्गदर्शन करुन एच्. आय.व्ही. टेस्टींग ट्रेनर ट्रेनिंग देण्यात आली. एच्. आय. व्ही समुपदेशक यांनी विद्यार्थ्यां अनमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पतला त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व मोठ्या प्रमाणात रासेयेचे स्वयंसेवकांची उपस्थिती होती.

**१९)   रासेयो विद्यार्थी स्वयंसेवकांची बैठक :**

दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थी स्वयंसेवकांची बैठक घेण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांमध्ये गटचर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या नाविण्यपूर्ण कल्पना व त्यांच्या सुप्त गुणांना संधी मिळणेसाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी यावेळी नियोजन करण्यात आले. या बैठकीत ‘स्वच्छता दूत’ म्हणून कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना ओळखपत्र देण्याचे नियोजन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इत्यादी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**२०)   रासेयो स्थानिक समन्वय समितीची बैठक :**

दि. २७ ऑगस्ट, २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना समन्वय समितीची बैठक महाविद्यालयाचे प्राचार्यांच्या कार्यालयात घेण्यात आली. या बैठकीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे होते. या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयात रासेयोच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची चर्चा करण्यात आली. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार, उपप्राचार्य सौ. सुचेता वाघमारे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे तसेच समन्वय समितीचे सदस्य डॉ. अनुजा जाधव, प्रा. राजेंद्र शास्त्री, प्रा. विजय दळवी, डॉ. सचिन भंडारे, डॉ. प्रीती पोहेकर, प्रा. सूर्यकांत मस्के, प्रा. दत्तात्रय सोनकांबळे व रासेयो चे प्रतिनिधीक स्वयंसेवक उपस्थित होते.

**२१)   रासेयो कार्यक्रमाधिकाऱ्यांची जिल्हास्तरीय बैठक:**

दि. ३१ ऑगस्ट, २०१९ रोजी सायंकाळी ठीक ४.३० वा. दयानंद कला महाविद्यालय येथे लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व कार्यक्रमाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीसाठी शिक्षण उपसंचालक डॉ. संजय यादगीरे, रासेयोचे विभागीय समन्वयक प्रा. अ. ना. शिंदे, जिल्हा समन्वयक डॉ. संदीप जगदाळे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक तसेच राजर्षी शाहू महाविद्यालयातील रासेयाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांच्यासह लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील रासेयोचे कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.

**२२) पर्यावरणपूरक गणपती विसर्जन मदतकार्यात रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग :**

दि. १२ सप्टेंबर, २०१९ रोजी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी 'पर्यावरणपूरक गणपती विसर्जन व 'गणेश मूर्ती संकलन' मदत कार्यात सक्रीय सहभाग घेतला. लातूर जिल्ह्यातील जिल्हाधिकारी श्री. जी. श्रीकांत व महानगरपालिकेच्या वतीने यावर्षी पाऊस कमी झाल्यामुळे तलावांमध्ये गणेशमूर्ती विसर्जनासाठी पाणी नसल्यामुळे लातूर जिल्ह्यातील नागरिकांना गणपती मंडळांना आव्हान करण्यात आलेकी, आपल्या मंडळातील गणेशमूर्ती पर्यावरणपुरक पध्दतीने विसर्जित करण्यासाठी कव्हा रोड, लातूरच्या तलावाजवळ मुर्तीचे दान करण्यात यावे. यावेळी महाविद्यालयातील रासेयोच्या विद्यार्थ्यांनी गणेशमूर्ती संकलन कार्यात मोठी मदत केली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी, महानगरपालिका लातूरचे व पोलिस प्रशासनातील कर्मचाऱ्यांसोबत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व विद्यार्थी उपस्थित होते.

**२३) विद्यापीठस्तरीय व्यसनमुक्ती कार्यशाळेत रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग :**

दि. २० सप्टेंबर, २०१९ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व दयानंद कला महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय व्यसनमुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या ०९ विद्यार्थी स्वयंसेवकांनीसक्रीय सहभाग घेतला. या कार्यशाळेत विविध सत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती व जनजागृती करण्यासंबंधी मार्गदर्शन लाभले.

**२४) रासेयोच्या सुवर्णमहोत्सव दिनानिमित्त परिचय मेळावा व उद्‌बोदन कार्यशाळा :**

दि. २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयात दि. सप्टेंबर, २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५० व्या स्थापना दिनानिमित्त परिचय कार्यशाळा व उद्‌बोदन शिबीर आयोजित करण्यात आले. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे होते. कार्यशाळेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे रासेयोचे निर्देशक डॉ. शिवराज बोकडे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणसावंत यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी केले. याप्रसंगी डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय दळवी, रासेयोचे स्वयंसेवक विक्रांत शंके, कु. अंजली हारडे, कु. वैष्णवी बोधनकर, कु. पल्लवी करे, पांडुरंग कांबळे इत्यादीसह मोठ्या प्रमाणात रासेयोचे स्वयंसेवकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रतिक्षा मोरे व स्वप्नील मायाचारी यांनी केले.

**२५) महात्मा गांधी जयंती व मतदार जनजागृती प्लास्टिकमुक्त अभियान रॅली :**

दि. ०२ ऑक्टोबर, २०१९ रोजी भारत सरकार निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी यांची १५० वी जयंती साजरी करून शहरातील गंजगोलाई, सुभाष चौक, हनुमान चौक, बसस्थानक, गांधी चौक, जुने रेल्वेस्टेशन स्थानक परिसरात मतदार जनजागृती व प्लास्टिक मुक्त अभियानासाठी रॅली काढण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली व विविध परिसरात स्वच्छता मोहिम राबत गांधीजींची मूल्यात्मक जीवनसरणी अनुसरण्याचे आव्हान केले. या रॅलीत 'नवे वारे नवी दिशा, मतदान आहे उद्याची आशा', '१८ वर्षे केले पाल चला वापरु

मतदानाचा अधिकार', 'एका-एका मताने बनते-पडते सरकार', 'तुमचे मते करु नका बेकार' अशा घोषणा देण्यात आल्या.

प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, प्रा. सुचेता वाघमारे,एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. मुरली जाधव, प्रा. नितीन चव्हाण, प्रा. युवराज शिखरे व इतर प्राध्यापकांसह राष्ट्रीय सेवा योजना व भारत स्काऊट गाईडचे ६ मिळून एकूण ६७५ विद्यार्थ्यांना या रॅलीत सक्रीय सहभाग घेतला.

**२६) डोअर टू डोअर मतदान जनजागृती :**

दि. १७ आक्टोबर २०१९ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २१ ऑक्टोबरला विधान सभेची निवडणूक होणार असल्यामुळे लातूर शहरातील घरोघरी जाऊन मतदान प्रत्येकाने करुन आपला हक्क बजावला पाहिजे असे आवाहन करत मतदान जनजागृती केली. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत प्रा. सुदर्शन पाटील, प्रा.विजय गवळी, प्रा. विकास वाघमारे व इतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

**२७) विधानसभा निवडणूक महोत्सव २०१९ मध्ये रासेयो मतदानदूताचा सक्रीय सहभागः**

दि. २१ ऑक्टोबर २०१९ रोजी महाराष्ट्र सरकारची विधानसभा निवडणूक मतदान महोत्सव राबविण्यात आला या निवडणूक मतदान महोत्सवामध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी लातूर शहरातील विविध मतदान केंद्रावर मतदानदूत म्हणून कामगिरी पार पाडली. यावेळी पर्यवेक्षणाचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी केले.

**२८) नळदूर्ग येथे राष्ट्रीय सेवा योजनेची वनसहलः**

दि. २२ डिसेंबर, २०१९ रोजीराष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत इच्छूक स्वयंसेवकांची वनसहल नळदूर्ग येथे काढण्यात आली. या सहलीसाठी वरिष्ठ महाविद्यालयातील ६० आणि कनिष्ठ महाविद्यालयातील ३० पेक्षा अधिक स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.संभाजी पाटील, प्रा. सुदेवाड, डॉ. पुष्पलता कावळे, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. विजय गवळी या शिक्षकांनी सहलीसाठी विद्यार्थ्यांचेमार्गदर्शन केले.

सकाळी ठीक ८.०० वा. महाविद्यालयाच्या प्रांगणातून दोन बसेसमधून सहलीचे प्रस्थान झाले. स्वयंसेवकांच्या चैतन्यपूर्ण प्रतिसादामुळे एक अलौकिक उत्साह दिसून आला. या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दुर्गस्थापत्य कलेचा एक आदर्श व विशाल नमूना म्हणून उभा असलेला नळदूर्गचा किल्ला पाहण्याचा व इतिहासावर नजर टाकण्याचा योग आला. त्या किल्ल्यातील हत्तीखाना, मुन्सिफ कोर्ट, दरबार हॉल, रंगमहाल, जलव्यवस्था, नवबुरुज, उपली बुरुज, पाणचक्की, पाणीमहाल, नरमादी धबधबा, रणमंडळ, गंडभेरूंड इत्यादी ठिकाणे पाहून विद्यार्थी भारावून गेले.

दुपारच्या वेळेत विद्यार्थ्यांनी किल्ल्यातच जेवण आटोपले. सहभोजनाचा आस्वाद घेऊन तुळजादेवीच्या दर्शनासाठी तुळजापुरकडे प्रस्थान केले. सांजवेळी तुळजामातेच्या दर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये अद्भूत चैतन्य आल्याचे जाणवले. अशा प्रकारे रात्री ८.०० वाजेपर्यंत महाविद्यालयात पोहचून रासेयोची ही एकदिवसीय वन-सहल पुर्ण झाली.

या सहलीच्या यशस्वीतेसाठी स्वाती पवार, शिवानंद बुके, अंजली हारडे, श्रीनिवास शिंदे, गणेश पिटले या स्वयंसेवकांनी मेहनत घेतली तर त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी रासेयोचे वरिष्ठ कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे तसेच कनिष्ठ कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी व प्रा. सोमदेव शिंदे यांनी सहकार्य केले.

**२९) राज्यस्तरीय फिट इंडीया शिबीर :**

दि. १३ जानेवारी ते १८ जानेवारी २०२० दरम्यान रोहा रायगड येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय

फिट इंडीया शिबीरामध्ये महाविद्यालयाचे स्वयंसेवक शिवानंद बुके यांनी सहभागनोंदवला.

**३०) शाहू महाविद्यालयात ३१ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२० अंतर्गत 'सडक सुरक्षा- जीवन रक्षा' कार्यशाळा :**

दि. १६ जानेवारी, २०२० रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर आणि राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ३१ वे 'रस्ता सुरक्षा अभियान २०२०' अंतर्गतसडक सुरक्षा-जीवन रक्षा कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत वरिष्ठ वाहन निरीक्षक श्री. अशोक जाधव यांनी पी.पी.टी द्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. राजू नागरे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदेइत्यादी मंचावर उपस्थित होते.

कार्यशाळेत श्री. अशोक जाधव व राजू नागरे यांनी देशात होणारे अपघात त्याचीकारणे परिणाम यांची माहिती आकडेवारीसहीत सांगितली व वाहतुकीच्या नियमाविषयी सखोल मार्गदर्शन केले.यावेळी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनीही तंदुरुस्ती आरोग्य ही सर्वात मोठी संपत्ती आहे, असे मार्गदर्शन करतानासांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयोचे कार्यक्रमाधिकरी डॉ. कल्याण सावंत यांनी सूत्रसंचालन विक्रांत शंके, अभिषेक मोरे व आभार प्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**३१) शाहू महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन कार्यशाळा :**

दि. २५ जानेवारी, २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. औरंगाबाद येथील करिअर समुपदेशक मा. संतोष कार्ले यांनी करिअरच्या विविध संधी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात दि. २४ जानेवारी, २०२० रोजीच्या 'राष्ट्रीय बालिका दिन' ही साजरा करण्यात आला व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कु. पवार ज्योती व्यंकट हीने आंतरराष्ट्रीय बेसबॉल स्पर्धा चीन येथे भारतीय मुलींच्या संघाचे प्रतिनिधित्त्व केल्यामुळे व बारावी कला शाखेतील विद्यार्थिनी कु. कदम ऋतुजा, कु. सुरकुटे वेदिका, कु. बनसोडे राजेश्वरी यांनी क्रमश: दिल्ली व चंदीगडच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये सहभाग नोंदवल्यामुळे रासेयो विभागाच्या वतीने मंचावरील मान्यवरांच्या हस्ते बालिका दिवस निमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार, उपप्राचार्य प्रा. सुचेता वाघमारे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इत्यादी उपस्थित होते.

बारावीनंतर कला, वाणिज्य, विज्ञान किंवा आय.आय.टी. सारख्या इतर कोणत्याही शाखेमध्ये पदवी व पदव्युत्तर पर्यंतचे कौशल्यपूर्ण व्यावसायिक शिक्षण घेतल्यास ३२४ प्रकारच्या स्पर्धा परीक्षा देत येते. म्हणून विद्यार्थ्यांनी स्वत:तील सुप्त गुणांना बुध्दीमत्तापूर्वक ओळखून मन, इच्छा, स्वभाव कार्यशक्तीच्या आधारे व्यवसाय निवडल्यास व त्यामध्ये संयमाने कठोर परिश्रम घेतल्यास यश नक्कीच मिळते असे मत करिअर समुपदेशक संतोष कार्ले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना व्यक्त केले.

प्रास्ताविक उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे, सूत्रसंचालन प्रा. सोमदेव शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी केले. मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. एफ. ए. शेख प्रा. नितीन चव्हाण, प्रा. सुदर्शन पाटील, डॉ. विजयकुमार करजकर, प्रा. मुरली जाधव, प्रा. आर. एन. पंडित, प्रा. आर. एस. सावरे, प्रा. युवराज शिखरे, प्रा. संदिप कांबळे, प्रा. किरणशिंदे, प्रा. अवधुत अराध्ये, प्रा. रत्नराणी कोळी, प्रा. सोनाली पवार, प्रा. शिल्पा दाडगे व इतर शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले.

**३२) २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन व विविध उपक्रम:**

दि. २६ जानेवारी, २०२० रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात मोठ्या उत्साहात प्रजासत्ताकदिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात येऊन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळे उपक्रम

राबविले. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी देखील सक्रीय सहभाग घेत भारतीय संविधानाची प्रतिकृती तयार करुन एकिकडे भारताचे समाजसुधारक कशा पध्दतीने संविधानाचा वापर करुन देशाला प्रगतीपथावर घेऊन जात आहेत तर दूसरीकडे आतंकवादी, भृष्टाचारी लोक संविधानाचा गैरवापर करून देशाला कशापध्दतीने विनाशाकडे नेह आहेत. याचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. यावेळी संस्थेचे विविध मान्यवर, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व रासेयोचे कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**३३) जिल्हास्तरीय नेतृत्वगुण विकास शिबीर :**

दि. १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथे पार पडलेल्या नेतृत्वगुण विकास शिबीरामध्ये महाविद्यालयाचे तीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. १. अमरसिंह साळुंके २. निखिल वाघ

**३४) वाघोली येथे शाहू महाविद्यालयातील रासेयोचे विशेष युवक शिबीर (दि. १८ ते २४ फेब्रुवारी, २०२०) शाहूच्या रासेयो च्या विशेष युवक शिबीराचे उद्घाटन :**

दि. १८ फेब्रुवारी, २०२० रोजी मौजे वाघोली ता. औसा, जिल्हा लातूर येथे 'पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धन स्वच्छ भारत-सुंदर भारत अभियानासाठी' राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष युवक शिबीराचे उद्घाटन उस्मानाबादचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे होते. यावेळी मंचावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील रासेयो विभागाचे संचालक डॉ. शिवराज बोकडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तसेच श्री. संतोष सोमवंशी, सरपंच श्री. गोपिचंद पवार, उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, उपप्राचार्य डॉ. ई. यु. मासूमदार इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. संभाजी पाटील यांनी केले. कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी शिबीर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. यावेळी वाघोलीचे ग्रामस्थ व शिबीरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**३५) शाहू महाविद्यालयातील रासेयो विशेष युवक शिबीराचा समारोप ज्ञानावर आधारित समाज उभारला गेला पाहिजे :**

दि. २८ फेब्रुवारी, २०२० पर्यावरणाच्या रक्षणात ग्रामीण भागाची भूमिका महत्तवाची असल्यामुळे गावातील सर्वांगिण विकास घडवण्यासाठी स्थानीय युवकांच्या शिक्षणावर विशेष लक्ष दिले पाहिजे. शिक्षणाच्या क्रांतितूनच गावाच्या व देशाच्या विकासाला गती मिळते. म्हणून शासनाद्वारे ग्रामीण भागात ज्ञानावर आधारित समाज उभारला गेला पाहिजे. असे मत शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबीराच्या समारोप कार्यक्रमात व्यक्त केले.

राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे वाघोली, ता. औसा येथे आयोजित पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन आणि स्वच्छ भारत-सुंदर भारत अभियानासाठी विशेष युवक शिबीराच्या समारोप समारोहाप्रसंगी ते बोलत होते. मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष व शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे उपाअध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए. जे राजू, रासेयोचे विभागीय समन्वयक डॉ. संदीप जगदाळे, जिल्हा समन्वयक डॉ. संतोष पाटील, सरपंच श्री. गोपिचंद पवार यांची उपस्थिती होती.

मौजे वाघोली ता. औसा येथे दि. १८ ते २४ फेब्रुवारी, २०२० दरम्यान झालेल्या सातदिवसीय शिबीरात १५ शोष खड्डे व वृक्षारोपांच्या लागवडीसाठी १४५ खड्डे खोदण्यात आले. दोन तलावांच्या दगडांची पिचिंग करण्यात आली. तसेच गावाची साफसफाई करणे, वृक्ष दिंडी काढणे, अंधश्रध्दा निर्मूलनपर प्रायोगिक कार्यक्रम, कवि संमेलन, महिला मेळावा व आरोग्य शिबीर, सांस्कृतिक व बौध्दिक यांसारखे विविध कार्यक्रम घेण्यात आले. समारोप कार्यक्रमात डॉ. संदीप जगदाळे व डॉ. संतोष पाटील यांनीही शिबीरार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी वाघोली गावाला दत्तक घेऊन 'स्मार्ट व्हिलेज' बनवण्याचा संकल्प करून येत्या पाच वर्षात गावाच्या विकास कामात

लक्ष देऊन गावाचा कायापालट करुन दाखवणार असे सांगितले.

सदर शिबीर यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार,प्रा. सुचेता वाघमारे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. अर्चना टाक यांनी विशेष प्रयत्न केले. तर सरपंच गोपिचंद पवार, जि.प. शाळेचे मुख्याध्यापक श्री.जमीर शेख, ग्रामस्थ श्री. मारुती ढोबळे, श्री. शामराव मोरे, श्री. राम टेंकाळे, श्री. भानुदास जाधव व रासेयोचे प्रतिनिधी विद्यार्थी शिवानंद बुके, प्रसाद काळे, श्रीनिवास शिंदे, विक्रांत शंके, वैष्णवी पांचाळ, सोहेल शेख, ऋषिकेश अट्टल, अभिषेक मोरे, विशाल जाधव, निलेश चलमले, आकाश सोनकांबळे यांनी विशेष परिश्रम घेत सहकार्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याण सावंत, सूत्रसंचालन प्रा. सोमदेव शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी केले.

**३६) एक दिवसीय विद्यापीठस्तरीय कॅन्सर अवेयरनेस प्रोग्राम :**

दि. ०३ मार्च २०२० रोजी आंबागोपाल फाऊंडेशन, अंधेरी वेस्ट, मुंबई व स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या एक दिवसीय कॅन्सर जनजागृती व सेंद्रीय शेती कार्यशाळेत महाविद्यालयाच्या ०९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**३७) विद्यापीठस्तरीय युवती कार्यशाळा:**

दि. ०७ मार्च ते ०९ मार्च २०२० दरम्यान राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथे पार पडलेल्या विद्यापीठसतरीय युवती कार्यशाळेमध्ये महाविद्यालयाच्या १२ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवत उत्कृष्ठ कामगिरी केली.

Principal
Rajarshi Shahu Mahavidyalaya,
LATUR

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**

# SELECTED PHOTOGRAPHS




**Honb. Dr MahadevGhavane and *Anis* activist ShriMadhavBavge with de-addication of alcohol awarness rally organised by andhshraddhanirmulansamiti,and NSS**




**Students Participated in University level Special Camp FOR Cleanliness**




**KilleSwachataAbhiyan  at Naldurg Fort**



**District Level Road Show Competition on Occasion of World AIDS Day**




**Killeswachataabhiyan of KilleDharur with K. D. Savant Sir and NSS Volunteers**



**De-addication awareness program in collage**




**GROUPS PHOTO OF ECO-FRIENDLY GENESHA FESTIVAL ORGANISED BY**




**Students participated in Republic Day Pared 2020**




**Program Rasta SurakshaAbhiyan " SadaksurakshaJivanRaksha "**




**Students presented posters in Poster presentation Competition on blood donation Program**




**Dr. A.P.J.AbdulkalamJayanti Program**




Visit of Dr.AtulSalunke , Dr.ShivrajBokade, Dr.SantoshPatil




Tree plantation Program at  S.T.Bus  Stand Latur




Calibration of Birth Anniversary of LokmanyaTilak&Chandrashekhar Azad.




Volunteers participated in Farmers padyatra




Celebration of World Blood Donation Day



Vol. Shiva Bukke participated in  in Fit India C amp at Raigar



**Honb. Dr. GopalraoPatil, Principal Dr.M.H.Gavane , Dr.K.D.Savant , On occasion of Blood Donation camp10-10-2019**




**Best Vol (Disttict) Award to Miss Rupali Gutte**



**On Occasion of Poster Presentation Compatition for awreness of AIDS**



HIV infection testing Camp in college



Dental diseases check-up Camp




Honb. Principal Dr. Mahadev  Gavhane , Vice Principal Dr. E.U.Masumdar P.O.Dr. K.D.Savant on ocassion of program in Sanvidhan Jagruti Saptah